दरड कोसळली; करूळ घाट चार तास ठप्प

सिंधुदुर्गात संततधार : सरासरी ९९.५ मिमी. पावसाची नोंद

कणकवली : पुढारी वृत्तसेवा

तालुक्यात पडत असलेल्या धुवाधार पावसाचा फटका करूळ व भुईबावडा घाटाला बसत आहे. करूळ घाटात शुक्रवारी पहाटे गगनबावड्यापासून सुमारे २ किमी. अंतरावर असलेल्या यू आकाराच्या वळणावर दरड पडल्यामुळे घाटातील वाहतूक तब्बल चार तास ठप्प झाली होती. दरम्यान घाटातील वाहतूक भुईबावडा घाटमार्गे वळवण्यात आली होती. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जेसीबीच्या सहायाने दरड हटवून वाहतूक सुरळीत सुरू केली . तर भुईबावडा घाटात सुद्धा दगड माती रस्त्यावर येत आहे. मात्र वाहतूक सायंकाळी उशिरापर्यंत सुरू आहे.

सिंधुदुर्गात गेल्या २४ तासांत सरासरी ९९.५ मिमी. पावसाची नोंद झाली. आतापर्यंत जिल्ह्यात ७९६ मिमी. पाऊस झाला आहे. गुरुवारी सर्वाधिक पाऊस वेंगुर्ले तालुक्यात १६७ मिमी. झाला. तर कणकवली, कुडाळ, देवगड, सावंतवाडी तालुक्यात १०० मिमी. पेक्षा अधिक पाऊस झाला आहे. शुक्रवारी दिवसभर अधूनमधून उघडीप घेत पावसाच्या सरीवर सरी सुरुच होत्या. मात्र कोठेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची नोंद नाही.

वैभववाडी तालुक्यात गेले तीन, चार दिवस जोरदार अवकाळी पाऊस पडत आहे. या पहिल्याच पावसात कोकण व पश्चिम महाराष्ट्र यांना जोडणाऱ्या करूळ व भुईबावडा घाटात छोट्या मोठया दरडी कोसळत असून यामुळे वाहतुकीला अडथळा होत आहे. गुरुवारी सायंकाळी भुईबावडा घाटात दरड कोसळली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाने जेसीबीच्या साहायाने दरड हटवून वाहतूक सुरळीत सुरू केली. तर करूळ घाटातही पडझड झाली होती

भातशेतीचे वाफे जलमय

गेले दोन दिवस पडलेल्या धुवाधार पावसामुळे भातशेतीचे वाफे तुडुंब भरुन जलमय झाले आहेत. दोन दिवसापूर्वी काही भागात शेतकऱ्यांनी पेरणीच्या कामांना सुरुवात केली होती. मात्र जोरदार पाऊस असल्याने या कामात व्यत्यय येत आहे. भातशेतीचे वाफे तुडुंब भरल्याने पेरणी कशी करायची असाही प्रश्न बळीराजासमोर आहे.

हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र शुक्रवारी दुपारी २.३० वा. पर्यंत कायम होते. येत्या पाच दिवसांत दक्षिण कोकणात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मान्सून प्रभावित झाला असून त्याचे आगमन वेळे आधी होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

शुक्रवारी सलग तिसऱ्या दिवशीही वादळी वाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पावसामुळे देवगड तालुक्यात झाडे घरावर पडून घरांची पडझड झाली असून सुमारे ६० हजाराचे नुकसान झाले आहे.सलग दोन दिवस अर्धशतक पार केलेल्या पावसाने तिसऱ्या दिवशी मात्र शतक पार केले आहे. तीन दिवसात पावसाने द्विशतक पार केले. दहिबांव-नारिंग्रे पुलाचे काम सुरू असल्याने पर्यायी मार्ग काढण्यात आला होता. मात्र तीन दिवस संततधार पडणाऱ्या पावसाने हा मार्गच वाहून गेल्याने दहिबांव व नारिंग्रे गावाचा संपर्क तुटला आहे.

देवगड तालुक्यात सलग तीन दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हाहाकार उडविला असून घरांची पडझड होवून सुमारे ६० हजाराचे नुकसान झाले आहे. २३ मे रोजी सकाळी ६ वा.सुमारास फणसगाव येथील शुभलक्ष्मी काशीराम आडीवरेकर यांच्या घराच्या पडवीवर आंब्याचे झाड पडून सुमारे ५० हजाराचे नुकसान झाले तर २२ मे रोजी पहाटे २.३० वाजता कुवळे-घाडीवाडी येथील सखाराम बाळकृष्ण घाडी यांच्या घरावर माडाचे झाड पडून सुमारे ८७५० रूपयाचे नुकसान झाले आहे.

रत्नागिरी आरटीओ राज्यात अव्वल!

शंभर दिवसांच्या विशेष मोहिमेत समाज कल्याण विभाग दुसरा

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र शासनाच्या वतीने १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम घेण्यात आली. यामध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेलया महाराष्ट्रातील जिल्हा स्तरावरील शासकीय कार्यालयाची यादी शुक्रवारी जाहीर करण्यात आली आहे. दुसऱ्या टप्प्यातील मोहिमेत कोकणातील रत्नागिरी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करून अव्वल ठरले आहे तर दुसरा क्रमांक रत्नागिरीच्या समाज कल्याण सहाय्यक आयुक्त विभागाने पटकाविला आहे.

१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम म्हणजे सरकारी कार्यालयांमधील कामकाजात सुधारणा करण्यासाठी आयोजित केलेली एक मोहीम आहे. या मोहिमे अंतर्गत कार्यालयांमध्ये कामकाजाची पध्दत सुलभ करणे, सोयीसुविधा वाढवणे, स्वच्छतेवर लक्ष देणे, नागरिकांच्या तक्रारींचे निवारण, तंत्रज्ञानाचा वापर यासह नागरिकांना चांगले आणि शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या वतीने विशेष मोहिम घेत असतात. दुसऱ्या टप्प्यातील मोहिमेत रत्नागिरी जिल्ह्याने बाजी मारली असून उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने अव्वल स्थान पटकाविले आहे.

या मोहिमेमध्ये प्रादेशिक परिवहन विभागाने मोटार वाहन विभागाचे संकेतस्थळ करून एकुण ११५ सेवा ऑनलाईन केल्या आहेत. ५० फेसलेस आहेत ही सेवा नागरिक घरी बसून घेवू शकतात. सारथी अंतर्गत १७ सेवा, वाहनअंतर्गत ३३ सेवा दिल्या, दिव्यांग व्यक्तींना प्रवेश करण्यासाठी सुलभता व विना अडथळा परिचालन, योग्य प्रशिक्षण, मोफत वायफाय सेवा दिल्या. सर्वच कार्यालयात स्वच्छतेला प्राधान्य देण्यात आले. जुने भंगार साहित्य विल्हेवाट लावली तर जुन्या ११८ वाहनांचा लिलाव लावला. तक्रार आल्यानंतर १०० टक्के तक्रार निवारण, लोकशाही दिनी प्रलंबित अर्ज निकाली काढले. कार्यालयीन सोयीसुविधा, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी, ई- ऑफिस प्रणालीचा वापर, एआयचा वापर करून अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण व जानेवारी ते मार्च दरम्यान ओव्हरस्पीड, विना हेल्मेट दुचाकीवर कारवाई करण्यात आली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले एक्सद्वारे पोस्ट

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात राज्याच्या महसूली विभागांमधील ४० विभागस्तरीय कार्यालयाच्या व सर्व जिल्ह्यामधील ४२ जिल्हास्तरीय कार्यालयांच्या स्पर्धेचा निकाल जाहीर करताना मला आनंद होतोय. एकुण १० मुद्यांवर या सर्वच क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल त्यांचे मनपूर्वक अभिनंदन तसेच पुढील कामगिरीसाठी शुभेच्छा देतो. टॅक्स, प्रमाणपत्र नूतनीकरण एसएमएस अर्ल सेवा केल्या. अशा सोयीस्कर सेवा दिल्या मुळे रत्नागिरी प्रादेशिक परिवहन विभागाने प्रथम पटकाविले आहे.

> जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे आम्ही कामे केली. आमच्या व टिमने केलेल्या कामामुळे दुसरा क्रमांक मिळाला याचा आनंद वाटतोय. कमी स्टाफ असूनही कामात सूसुत्रता आणण्याचा प्रयत्न केला. नागरिकांना सुविधा दिल्या.
>
> **दीपक घाटे,** सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, रत्नागिरी

किनारपट्टीवर २१ निवारा केंद्रे

२४८ कोटींच्या निधीची तरतूद- मंत्री उदय सामंत

चिपळूण शहर : पुढारी वृत्तसेवा

कोकणातील संवेदनशील व किनारपट्टी भागात शासनाच्या माध्यमातून कायमस्वरूपी निवारा केंद्रे उभारणीसाठी २४८ कोटी रुपयांची तरतूद झाली असून, जिल्ह्यात २१ ठिकाणी ही केंद्रे उभारण्यात येणार आहे आपत्ती काळात त्यांचा वापर होईल तर त्यानंतर त्यांच्या उपयोग सभागृह म्हणून होऊ शकतो, अशी माहिती पालकमंत्री उदय सामंत त्यांनी शुक्रवारीपत्रकार परिषद दिले.

ना. उदय सामंत यांनी पत्रकार परिषद आपत्ती संदर्भातील बैठकीबाबत निर्णय यांची माहिती देताना सांगितले की, संवेदनशील भागातील दरड, नदीकाठ विज ड्रेनेज यावर विशेष लक्ष ठेवण्यासाठी तसेच पूर्ण नियंत्रणासाठी प्रांत अधिकाऱ्यांच्या नियोजनात १८ अधिकाऱ्यांची पथक करण्यात आले आहे. धोकादायक ठिकाणाच्या वस्तीला स्थलांतरित करावे, नाले सफाई बरोबरच पूर्ण स्थितीवर नियंत्रणासाठी धरणातील पाणी पातळी नियंत्रण नियमनासाठी पाहणी करावी, असे सूचना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. संरक्षण जाळीची व्यवस्था करावी, दरड प्रवाह क्षेत्रात नदीकाठी, नाले, ओढे, या ठिकाणची अनावश्यक वावर टाळावा, हवामान खात्याच्या सूचनांचे पालन करा, NDRF, SDRF व स्थानिक यंत्रणा सज्जा ठेवली आहे.

५ महिन्यात ११५ व्यक्तींना सर्पदंश

विंचू, माकड यासह इतर प्राण्यांनी चावे घेतल्याच्या १२०० घटना

रत्नागिरी: पुढारी वृत्तसेवा

रत्नागिरी शहर जिल्ह्यात संर्प दंशचे प्रमाण वाढले असून पाच महिन्यात तब्बल १५५ जणांना सर्प दंशच्या घटना घडल्या असून यापैकी एकाचा ही मुत्यू झालेला नाही तर विंचू, माकड, मांजरसह इतर प्राण्यांनी चावा घेतल्याच्या १२०० घटना घडलेल्या आहेत. दरम्यान, आता मान्सूनपूर्व पावसाने रत्नागिरी जिल्ह्याला चांगलेच

झोडपले आहे. त्यामुळे रत्नागिरीकरांनो सावधान पावसाळ्यात साप, विंचू बाहेर निघून घरात येण्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे योग्य ती काळजी घेणे गरजेची आहे.

उन्हाळा आता बऱ्यापैकी संपला असून जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावली आहे. उन्हाळ्यानंतर पावसाळ्यात साप व विंचू मोठ्या प्रमाणात बाहेर पडत असतात. पावसात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्यामुळे त्यांना जागा मिळत नाही. त्यामुळे ते मानववस्तीकडे वळत असतात. त्यामुळे नागरिकांनी योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे. पावसाळ्यात सरपटणाऱ्या प्राण्यांकडून विशेषता साप, विंचू दंशचे प्रमाण वाढत असते. उन्हाळ्यानंतर पावसाळ्यात सर्प अनेक नागरिकांना चावा घेवून जखमी करीत असतात. जानेवारी ते मे दरम्यान तब्बल ११५ जणांना सर्प दंश झाले आहे. एकाचाही मृत्यूची नोंद झालेली नाही. सिव्हील रूग्णालयात सर्वांवर उपचार करण्यात आले आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती वादाच्या भोवऱ्यात

सचिव व माजी सभापतींनी मंजुरी न घेता जमीन विकली; चौकशी होणार

कल्याण : पुढारी वृत्तसेवा

कल्याण कृषीउत्पन्न बाजारसमिती नेहमीच वादाच्या भोवऱ्यात सापडत असते. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीला शासनाने मुदत वाढ दिल्या नंतर या कालावधीत कोणत्याही प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही तसेच अपवादात्मक परिस्थितीत धोरणात्मक निर्णय घ्यावयास झाल्यास शासनाची मान्यता घ्यावी असे आदेशित केले असताना कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिव व माजी सभापतींनी पणन संचालकाची मजुरी न घेता बेकायदेशीर ठराव करून जमीन व टेरेस विकून भ्रष्टाचार केल्या बाबत सखोल चौकशी करून संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची मागणी रवी गायकवाड यांनी पणन संचालक, उपसचिव सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे यांच्या कडे केली आहे.संबंधितावर गुन्हे दाखल न केल्यास शांतातेच्या मार्गाने पणन संचालक, यांच्या कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात येईलअसा इशारा निवेदनात दिला आहे .

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती च्या संचालक मंडळाचा कार्यकाळ २१ एप्रिल २०२४ रोजी संपुष्टात आला होता. कार्यकाळ संपल्या नंतर पहिली मुदत वाढ सहा महिन्या साठी २१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत देण्यात आली होती . पहिली मुदतवाढ संपल्या नंतर दुसऱ्यांदा मुदत वाढ मागितली असता २१ एप्रिल २०२५ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली.

उल्हासनगर गुन्हे शाखेच्या पथकाची यशस्वी कारवाई

चोरी झालेल्या तीन मोटरसायकल हस्तगत

उल्हासनगर : पुढारी वृत्तसेवा

उल्हासनगर गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने अंबरनाथ परिसरातून मोटरसायकल चोरी करणाऱ्या दोन सराईत आरोपींना अटक करत त्यांच्याकडून चोरीच्या तीन मोटारसायकली हस्तगत केल्या आहेत. एकूण १,०५,००० रुपयांच्या किंमतीच्या या गाड्या जप्त करण्यात आल्या असून आरोपींनी तीन गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

उल्हासनगर गुन्हे शाखेचे पोलीस शिपाई अशोक थोरवे आणि रामदास उगले यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की मोटरसायकल चोरी करणारे रेकॉर्डवरील आरोपी अरुण राजू गुप्ता, किसन नंदू गुप्ता हे ऑर्डनन्स फॅक्टरी परिसरात येणार आहेत. ही माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली

पोलीस कर्मचारी श्रीरंग गोसावी, गणेश गावडे, राजेंद्र थोरवे, योगेश वाघ, चंदू सावंत, रितेश वंजारी आणि संजय शेरमाळे यांच्या पथकाने तत्काळ त्या ठिकाणी सापळा रचून दोन्ही आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून पोलिसांनी एकूण १ लाख ५ हजार रुपये किमतीच्या ४ दुचाकी हस्तगत केल्या आहेत.

जाहिर नोटीस

माझे अशिल श्रीमती स्वप्ना विनेश नागप, राहणार ११ अ/३३१३, हरि ओम सह-गृह. संस्था (म), अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई - ४०००३३. यांच्या सांगण्यावरुन जाहीर नोटीस देत आहे. माझ्या अशिलाचे वडिल कै. जगदीश सदाशिव राणे यांचा मृत्यू दि. २९ ऑगस्ट २०१७ रोजी झाला आहे. वारस प्रमाणपत्रासाठी माझ्या अशिल यांनी अर्ज केला असून त्यांच्या पश्चात खालीलप्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

अनु. क्र.	वारसांची नांवे	मृयत व्यक्तीशी नाते
१.	श्रीमती स्मिता जगदीश राणे	पत्नी
२.	श्रीमती तेजाली सचिन महाब्दी	मुलगी
३.	श्रीमती स्वप्ना विनेश नागप	मुलगी
४.	श्रीमती शामल स्वप्निल आंबेकर	मुलगी
५.	श्रीमती निकिता केतन सावंत	मुलगी

या व्यतिरिक्त कोणीही वारस नाही. माझ्या अशिलांच्या म्हणण्यानुसार मयत कै. जगदीश सदाशिव राणे यांच्या पश्चात वरील नावे कायदेशीर वारस असून माझ्या अशिलाच्या वतीने वारस प्रमाणपत्रासाठी जाहीर नोटीस देत आहोत. याकरिता कोणास काही हरकत व आक्षेप असल्यास पंधरा दिवसांच्या आत आपला दावा नमूद करावा अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल.

स्थळ : मुंबई सही/-
दिनांक : २४/०५/२०२५ वकील सुधांशू शिंदे
पत्ता : ११/७७०, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई ४०००३३.

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ म्हाडा MHADA

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

ई-निविदा सूचना क्र. ६३ / २०२५-२६

कार्यकारी अभियंता [पश्चिम] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ (दूरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे/सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सीपीडब्लूडी/एमईएस/मुंबई महानगरपालिका/सिडको/रेल्वे/बीपीटी/एमआयडीसी/एम.जे.पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदारांकडून एकूण ९ कामांकरीता बी-१ (Percentage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	टप्पा	कालावधी	अ.क्र.	टप्पा	कालावधी
१	निविदा विक्री सुरू	२६/०५/२०२५ सकाळी १०:३० वाजता	२	निविदा विक्री बंद	०२/०६/२०२५ दुपारी २:३० वाजता
३	तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक	०३/०६/२०२५ दुपारी ३:०५ नंतर	४	आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक	०४/०६/२०२५ सकाळी १०:३० नंतर

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : १. विस्तृत ई-निविदा सूचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

टिप : २. निविदा सूचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

Follow us:@mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (प),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

CPRO/A/419
म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

PUBLIC NOTICE

This Notice is hereby given to general public that **Shri. Rakesh Kumar Verma and Mrs. Shalini Varma** for Purchase of Flat no.D301/302, 3rd floor,D-wing, Shankar Apartment CHS Ltd, Plot no. 8, Sector 12, Kharghar Navi Mumbai (hereby referred to as said premises) the flat was Purchased by **Shri. Rakesh Kumar Verma and Mrs. Shalini Varma** as owners the Original documents pertaining to flat was mortgaged to State Bank Of India for **SBI Home Loan.** State Bank of India HCL CBD Belapur lost/misplaced the document during transit which was **Society Share Certificate** no.053 issued by Shankar Apartment Co-op Housing Society Ltd Registration No. NBOM/CIDCO/HSG(OH)/2141/JTR dated 2006-2007 originally in a name of Krishan Das Menon (D 301-302) with Five Paid shares of Rs. 50 each numbered from 161 to 165 both inclusive in Shankar Apartment dated 15/11/2011.

If any person/s has/have received the above mentioned documents or if any persona's has/have any claim and /or claiming and interest in the said premises or any part thereof by way of sale, gift, lease, tenancy , inheritance, exchange , mortgage, charge, lien, trust, possession, easement, attachment otherwise howsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned at the office address Kanchan Sharma, Advocate, at Office Niharika Mirage, Plot No.274, Sector-10,Kharghar, Navi Mumbai - 410210 or M2-1302, SBI Colony, Nerul East, Navi Mumbai - 400706 Mobile number +91-9422306128 within 15 days from the date of publication of this notice, failing which the title of **Shri. Rakesh Kumar Verma and Mrs. Shalini Varma** shall be considered to be absolute and final, without any reference to succeed and the same, if any, shall be considered as waived.

sd/-
Kanchan Sharma
Advocate

Dated the :- 24 May, 2025

उल्हासनगर महानगरपालिका

आरोग्य विभाग

ई-निविदा सूचना सन २०२५-२०२६

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर, जि. ठाणे क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत शहराच्या जुन्या साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करण्याकरीता अनुभवी निविदाकार यांच्याकडून दोन लिफाफा पध्दतीने जाहीर ई-निविदा https://mahatender.gov.in या वेबसाईटवरुन मागवित आहे.

अ. क्र.	निविदेचा तपशिल	कोरी निविदा पत्रकाची किंमत	निविदा अनामत रक्कम (EMD)	सुरक्षा अनामत रक्कम	निविदा रक्कम
१	उल्हासनगर येथील जुनी खडी मशीन, गायकवाड पाडा येथे डंपिंग ग्राऊंडवरील साठलेल्या कचऱ्यावर शास्त्रोकृत पध्दतीने बायोमायनिंग प्रक्रिया करण्यासाठी अभिकर्ता नेमणूक करणे.	२९५००/- (२५०००+१८% GST)	२७,००,०००/-	निविदा कार्यादेशाच्या किमतीवर ३%	२७ कोटी अंदाजित

१) निविदा विक्री व स्विकृती दि. २३/०५/२०२५ ते ०९/०६/२०२५ रोजी ०५:०० वाजेपर्यंत राहील.

२) निविदेचा पहिला लिफाफा शक्य झाल्यास दि. ०९/०६/२०२५ रोजी सायंकाळी ०५:१० वाजता ई-टेंडरींग विभाग नागरी सुविधा केंद्र किंवा आयुक्त यांचे दालनात उघडण्यात येईल.

३) निविदापूर्व बैठक दिनांक २९/०५/२०२५ रोजी सकाळी १२:३० वाजता अतिरिक्त आयुक्त (शहर) उल्हासनगर महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.

आलेल्या एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी राखून ठेवलेला आहे.

जा.क्र.उमपा/पीआरओ/१२५/२०२५
दिनांक : २३/०५/२०२५

सही/-
सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

kotak कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय - २७ बीकेसी, सी-२७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
शाखेचा पत्ता : २ रा मजला, प्लॉट क्र. १०५, द बुलेव्हार्ड मॉल रोड, लुधियाना पंजाब - १४१००१.

सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ कायद्याच्या अनुच्छेद १३ (२) अंतर्गत सूचना

खाली नमूद अधोहस्ताक्षरित, कोटक महिंद्र प्राईम लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे, जो भारतीय कंपनी कायदा १९६५ अंतर्गत नोंदणीकृत नॉन-बँकिंग फायनान्स कंपनी आहे. त्यांचे नोंदणीकृत कार्यालय २७ बीकेसी, सी-२७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१, (यापुढे केएमपीएल म्हणून संदर्भित) येथे आहे. जे सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत नियुक्त केले आहे, याद्वारे तुम्हाला खालील सूचना जारी करत आहे.

कर्जदार/सह-कर्जदार/गहाणवटदारांचे नाव : १. सनरेज क्लोदिंग एलएलपीद्वारे त्यांचे भागीदार : रवी इश्वर घनशानी (कर्जदार) यांचा पत्ता : २/१८३, १०१, नीलगिरी इंडस्ट्रिअल इस्टेट, टी.जे.रोड, शिवडी पश्चिम, मुंबई - ४०००१५. **तसेच :** युनिट क्र. ४१६, ४ था मजला, नीलगिरी इंडस्ट्रिअल इस्टेट, शिवडी नीलगिरी उद्योग भवन को-ऑपरेटिव्ह सोसा.लि., टी.जे.रोड, अशोक गार्डन अपार्टमेन्टच्या मागे, शिवडी पश्चिम, मुंबई - ४०००१५. **२. रवी इश्वर घनशानी (सह-कर्जदार/गहाणवटदार)** यांचा **पत्ता :** १. अविनाश अपार्ट., ३ रा रोड, युनियन पार्क, खार (पश्चिम), मुंबई - ४०००५२. **तसेच :** युनिट क्र. ४१६, ४ था मजला, नीलगिरी इंडस्ट्रिअल इस्टेट, शिवडी नीलगिरी उद्योग भवन को-ऑपरेटिव्ह सोसा.लि., टी.जे.रोड, अशोक गार्डन अपार्टमेन्टच्या मागे, शिवडी पश्चिम, मुंबई - ४०००१५. **३. सोनिया रवी घनशानी (सह-कर्जदार)** यांचा पत्ता : ३०१, अविनाश अपार्ट., प्लॉट क्र. ४३, ३ रा रोड, युनियन पार्क, पाली हिल, खार (पश्चिम), मुंबई - ४०००५२. **तसेच :** युनिट क्र. ४१६, ४ था मजला, नीलगिरी इंडस्ट्रिअल इस्टेट, शिवडी नीलगिरी उद्योग भवन को-ऑपरेटिव्ह सोसा.लि., टी.जे.रोड, अशोक गार्डन अपार्टमेन्टच्या मागे, शिवडी पश्चिम, मुंबई - ४०००१५.

कर्ज खाते क्रमांक : केएलएपी१७१५६.

१३ (२) सूचना दिनांक : १५.०५.२०२५. **एनपीए दिनांक :** ०५.०५.२०२५

अनु. १३(२) कायद्याअंतर्गत सूचनेनुसार मागणी सूचना दिनांक व रक्कम : दि. १५.०५.२०२५ रोजीनुसार रु. ७२,७४,०८७.८४/- (रु. बहात्तर लाख चौऱ्याहत्तर हजार सत्याऐंशी व चौऱ्याऐंशी पैसे मात्र)

गहाणवट मालमत्ता : सर्व भाग व भूखंड धारक युनिट क्र. ४१६, चौथा मजला, मोजमापित ४१.०० चौ.मीटर चटई क्षेत्र स्थित नीलगिरी इंडस्ट्रिअल इस्टेट, शिवडी नीलगिरी उद्योग भवन को-ऑपरेटिव्हा सोसायटी लि., २/१८३, ठाकरसी जिवराज रोड, शिवडी (पश्चिम), मुंबई - ४०००१५.

मूल्यांकनाकरिता प्रदान केलेल्या दस्तावेजांच्या प्रतीनुसार विषयाची मालमत्ता ओळखली जाते.

दिनांक : २४.०५.२०२५
ठिकाण : मुंबई

कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेडकरिता
सही/-
प्राधिकृत अधिकारी

प्राइम फोकस लिमिटेड

सीआयएन : L92100MH1997PLC108981
दूरध्वनी : ०२२ - ६७१५ ५०००, **फॅक्स :** ०२२ - ६७१५ ५००१.
नोंदणीकृत कार्यालय : प्राइम फोकस हाऊस, ऑफ सिटी बँक, लिंकिंग रोड, सिटी बँकेसमोर, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२.
ई-मेल : ir.india@primefocus.com; **वेबसाइट :** www.primefocus.com

टपाली मतदानाची सूचना

प्राइम फोकस लिमिटेड (**"कंपनी"**) च्या सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, कंपन्या कायदा, २०१३ (यापुढे **"कायदा"** म्हणून उल्लेखित) चे अनुच्छेद १०८, ११० व अन्य लागू तरतुदी, यामध्ये वेळोवेळी लागू कोणत्याही वैधानिक सुधारणा वा पुनराधिनियम यांचा समावेश व अन्य लागू तरतुदी काही असल्यास तसेच कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ (**"नियम"**) चे नियम २० व २२ वेळोवेळी सुधारित केल्यानुसार सहवाचन कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाद्वारे (**"एमसीए"**) जारी सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/२०२०, दि. ०८.०४.२०२०, सर्वसाधारण परिपत्रक क्र. १७/२०२०, दि. १३.०४.२०२० सहवाचन यासंदर्भात जारी पुढील परिपत्रके, नवीनतम परिपत्रक क्र. ९/२०२४, दि. १९.०९.२०२४ (**"संबंधित परिपत्रके"**), भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन ४४ (सेबी सूची विनियमन) तसेच भारतीय कंपनी सचिव संस्थेद्वारे जारी सचिवालयीन निकष - २ (**"एसएस-२"**) व अन्य लागू कायदे व विनियमन, काही असल्यास, यांमध्ये वेळोवेळी लागू कोणत्याही वैधानिक सुधारणा वा पुनराधिनियम यांचा समावेश यांच्या अनुपालनांतर्गत शुक्रवार, दि. १६.०५.२०२५ (**"निर्धारित अंतिम तारीख"**) रोजीनुसार ज्या सभासदांचे ई-मेल पत्ते कंपनीचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट अर्थात लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडकडे किंवा डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स यांच्याकडे नोंदवलेले असतील अशा सर्व सभासदांना कंपनीने कंपनीने स्पष्टिकरण अहवालासमवेत टपाली मतदान सूचना दि. १९.०५.२०२५ ची पाठवणी स्पष्टकरण अहवालासमवेत दि. २३.०५.२०२५ रोजी केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पूर्ण केली आहे. संबंधित एमसीए परिपत्रकांच्या अनुपालनांतर्गत टपाली मतदान सूचना, टपाली मतदान फॉर्म तसेच प्री-पेड बिझनेस रिप्लाय एन्व्हलप यांच्या कागदोपत्री प्रती पाठवण्याची आवश्यकता रद्दबातल आहे. परोक्ष केवळ परोक्ष ई-मतदान प्रक्रियेच्या माध्यमातून टपाली मतदान नि:पक्ष व पारदर्शक पद्धतीने आयोजित करण्यासाठी परीनिरीक्षक म्हणून श्री. मेहूल रावल, कार्यरत कंपनी सचिव (सभासदत्व क्र. : एसीएस - १८३००, सीपी नं. : २४१७०) यांची नेमणूक करण्यात आली आहे.

यासंदर्भात, सभासदांना सूचित करण्यात येत आहे की :

१. टपाली मतदान सूचनेत विहित विशेष विषयांवर सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (**"सीडीएसएल"**) यांच्याद्वारे उपलब्ध परोक्ष ई-मतदान प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून (**"परोक्ष ई-मतदान"**) मतदानाद्वारे विचारविनिमय करता येईल.

२. परोक्ष ई-मतदान कालावधी शनिवार, दि. २४.०५.२०२५ रोजी (स. ९.०० वा. भा. प्र. वे.) सुरू होईल व रविवार, दि. २२.०६.२०२५ रोजी (सायं. ५.०० वा. भा. प्र. वे.) संपेल. वरील कालावधीदरम्यान सभासद त्यांची मते इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देऊ शकतील. रविवार, दि. २२.०६.२०२५ रोजी सायं. ५.०० वाजता परोक्ष ई-मतदानाचे मोड्युल अकार्यरत करण्यात येईल व तत्पश्चात परोक्ष ई-मतदानास परवानगी नसेल. परोक्ष ई-मतदानाची प्रक्रिया टपाली मत